(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९६१] २ एस.सी.आर. ४८०

**दि अहमदाबाद टेक्सटाईल इंडस्ट्रीज रिसर्च असोसिएशन**

**- विरुद्ध -**

**दि स्टेट ऑफ बॉम्बे ॲण्ड अदर्स**

(पी. बी. गजेंद्रगडकर, न्यायमूर्ती, ए. के. सरकार, न्यायमूर्ती आणि के. एन. वांचू, न्यायमूर्ती)

*औद्योगिक विवाद - संशोधन संस्था, जर उद्योग असेल तर -"उद्योग", चा अर्थ - कसोटी - औद्योगिक विवाद अधिनियम,* १९४७ (१९४७ *चा अधिनियम क्रमांक* १४), *कलम* २ (जे).

अपीलकर्ता संघाची १९४७ साली स्थापना झाली आणि संस्थापकांचे उद्दिष्ट वस्त्रनिर्माण व्यापार किंवा उद्योग आणि त्यासह संलग्न असलेले किंवा त्याच्याशी आवश्यक असलेले इतर व्यापार व उद्योगांच्या संबंधी संशोधन आणि इतर वैज्ञानिक कार्य करण्याच्या प्रयोजनासाठी वस्त्रनिर्माण संशोधन संस्था स्थापन करणे होते. संघ चालविण्याचा खर्च अंशतः सदस्यांद्वारा आणि अंशतः सरकार व इतर स्त्रोतांकडून मिळणाऱ्या अनुदानाने भागविला जात असे.

संघाचे कार्य पद्धतशीरपणे चालविण्यात येत होते; तिचे उद्दिष्ट, समूहाच्या एका भागास म्हणजे, सदस्य - गिरण्यांना महत्त्वपूर्ण सेवा देणे होते; महत्वपूर्ण सेवा हि वस्तुनिर्माण प्रक्रिया, इत्यादी संबंधी शोध असल्याने, जास्त कार्यक्षमता, पुनःसंघटन व सदस्य- गिरणांच्या खर्चामध्ये घट प्राप्त करण्याच्या हेतूने असून, संघाचे कार्य कर्मचाऱ्यांच्या मदतीने करण्यात येत होते, ज्यापैकी काही पारिश्रमिकेवर नेमलेले तांत्रिक कर्मचारीवर्ग होते, ज्यांचा संघाचे कर्मचारी, जे संघाची मालमत्ता होती, म्हणून त्यांनी केलेल्या संशोधनाच्या निष्पत्तीमध्ये कोणताही हक्क नव्हता आणि सर्वसाधारणपणे एखादा व्यापार किंवा धंदा ज्या रितीने संघटित करण्यात येतो त्या रितीने तो संघटित करण्यात येत होता किंवा त्याची व्यवस्था करण्यात येत होती.

अपीलकर्ता आणि त्याच्या कामगारांमध्ये वेतनमान व महागाई भत्ता आणि घरभाडे भत्त्याचे प्रदान याच्याशी संबंधित विवाद निर्माण झाला, जो अभिनिर्णयासाठी

सोपविण्यात आला. अपीलकर्ता हा एखादा उद्योग नाही आणि अधिकरण औद्योगिक विवाद अधिनियमाच्या कलम २(जे) मधील "उद्योग" या शब्दाच्या व्याख्ये मध्ये समाविष्ट आहे असे मत मांडण्यात अधिकरण चुकीचे होते या कारणावर निदेशनास हरकत घेतली आणि अशी बाजू मंडळी कि ते शैक्षणिक कार्याच्या स्वरूपात असलेले संशोधन केंद्र आहे आणि म्हणून त्याचे व्यापाराच्या किंवा धंद्याच्या स्वरूपातील कार्यांशी साम्य नाही.

त्यामुळे प्रश्न असा होता की अपीलकर्ता हा औद्योगिक विवाद अधिनियमाच्या कलम २ (जे) च्या अर्थानुसार उपक्रम होता किंवा नाही आणि त्याचे कार्य स्टेट ऑफ बॉम्बे -विरुद्ध- हॉस्पिटल मजदूर सभा या प्रकरणात घालून दिलेल्या कसोट्यांची पूर्ती करतात किंवा नाही.

असा निर्णय देण्यात आला कि, ज्या पद्धतीने प्रश्नास्पद कार्य हे संघटित केले गेले किंवा त्याची व्यवस्था केली गेली ती पद्धतीला, तिचे कार्य यशस्वी होण्याकरिता आवश्यक असलेले नियोक्ता व कर्मचारी यांच्यातील सहकार्याच्या स्थितीला आणि तिचे समूहाला महत्वच्या सेवा देण्याच्या उद्दिष्टाला विभिन्न कार्य होईल अशा वैशिष्ट्यांपैकी काही वैशिष्ट्ये मानले जाऊ शकते, ज्यांस अधिनियमाचे कलम २(जे) लागू होऊ शकते.

प्रस्तुत प्रकरणात, ज्या पद्धतीने संघाचे कार्य संघटित करण्यात आले ती पद्धत, स्पष्टपणे असे दर्शविते कि ज्या अर्थोपायाने सदस्य-गिरण्या त्याच्या उद्योगांच्या संबंधात खूप नफा मिळवू शकतील अशा अर्थोपायाच्या शोधाच्या उद्दिष्टाने संघटित केलेल्या धंद्याच्या व व्यापाराच्या स्वरूपात होता. संघाचे कार्य स्पष्टपणे औद्योगिक विवाद अधिनियमाच्या कलम २ (जे) मधील "उद्योग" या शब्दाच्या व्याख्ये अंर्तगत येते आणि ते एखाद्या निव्वळ शैक्षणिक संस्थेशी एकरूप केले जाऊ शकत नव्हते आणि ते स्टेट ऑफ बॉम्बे -विरुद्ध- हॉस्पिटल मजदूर सभा या प्रकरणात नमूद केलेल्या कसोटीची पूर्ती करतात. अशा तऱ्हेने संघ अधिनियमाच्या कलम २ (जे) च्या अर्थानुसार एक उपक्रम आहे.

संघ आणि तिचे कर्मचारी यांच्यामध्ये जेव्हा विवाद निर्माण झाला तेव्हा तो औद्योगिक विवाद होता आणि तो अधिनियमा खाली अभिनिर्णया करीता रीतसर सोपवला जाऊ शकतो.

*स्टेट ऑफ बॉम्बे -विरुद्ध- हॉस्पिटल मजदूर सभा,* [१९६०] २ *एस. सी. आर.* ८६६ चे *अनुसरण करण्यात आले. द फेडरेटेड स्टेट्स स्कूल टीचर्स असोसिएशन - विरुद्ध - द स्टेट ऑफ व्हिक्टोरिया,* (१९२९) ४१ *सी. एल. आर.* ५६९ *लागू होत नाही.*

दिवाणी अपीलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. २२/१९५९.

निर्देशन (औ.अ.) क्र. १४१/१९५७ मध्ये औद्योगिक अधिकरण, मुंबई यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर १९५७ रोजी दिलेल्या निवाडयातून विशेष अनुज्ञा अपील.

अपीलकर्ता च्या वतीने एम. सी. सेटलवाड, भारताचे न्यायवादी (Attorney General), जे. बी. मेहता व आय. एन. श्रॉफ.

उत्तरवादी क्र.१ च्या वतीने विद्या धर महाजन, के. एल. हाथी व आर. एच. ढेबर.

उत्तरवादी क्र.३ च्या वतीने एन. सी. शाह, अध्यक्ष, इंजिनीअरिंग मजदूर सभा.

१७ नोव्हेंबर १९६०. या न्यायालयाचा न्यायनिर्णय वांचू , न्यायमूर्ती, यांनी दिला.

ही औद्योगिक अधिकरण, मुंबई च्या निवडाच्या विरोधात विशेष अनुज्ञेने केलेली अपील आहे. अपीलकर्ता आणि त्याचे कामगार यांच्यात वाद होता, जो गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे द्वारे अभिनिर्णयासाठी निर्देशित करण्यात आला होता. ते अपीलकर्त्याच्या काही कर्मचाऱ्यांचे वेतनमान व महागाई भत्ता तसेच घरभाडे भत्ता प्रदान करण्याशी संबंधित आहे. अपीलकर्त्याचे अधिकारणा समक्ष मुख्य म्हणणे असे होते कि, ते निर्देशन औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चा अधिनियम क्रमांक १४ (यापुढे अधिनियम म्हणून असे संबोधले जाईल) खाली विधिमान्य नव्हते कारण अपीलकर्ता हे अधिनियमातील अर्थान्तर्गत उद्योग नव्हते. अधिकारणाने हे म्हणणे फेटाळले व असा निर्णय दिला कि, निर्देशन वैध होते. त्यानंतर अधिकरण वादाच्या गुणदोषावर गेले, परंतु प्रस्तुत अपीलमध्ये त्याच्याशी आमचा काही संबंध नाही. असे न्यायाधिकरणाने ठरवणे चुकीचे होते.

अधिनियमाच्या कलम २(जे) मध्ये "उद्योग" ची व्याख्या देण्यात आली आहे ज्याचा अर्थ नियोक्ताच्या कोणत्याही धंदा, व्यापार , उपक्रम, निर्मिती किंवा आजीविका असा आहे आणि त्यामध्ये कामगारांची कोणतीही आजीविका, सेवा, रोजगार, हस्तव्यवसाय किंवा औद्योगिक व्यवसाय किंवा व्यवसाय यांचा समावेश होतो. अधिकरणासमोर चर्चा करण्यात आलेला मुख्य प्रश्न हा होता की, अपीलकर्ता हे कलम २

(जे) च्या अर्थांतर्गत एक उपक्रम होते का? कलम २(जे) च्या प्रयोजनासाठी उपक्रम म्हणजे काय, असा प्रश्न ह्या न्यायालयासमोर अनेक प्रकणांमध्ये विचारार्थ आला आहे, त्यापैकि अलीकडचे प्रकरण म्हणजे दि स्टेट ऑफ बॉम्बे -विरुद्ध - दि हॉस्पिटल मजदूर सभा [1], ज्यामध्ये सरकार द्वारे संचालित रुग्णालय कलम २(जे) मधील अर्थानुसार उपक्रम होते का, असा प्रश्न उदभवला होता. त्या प्रकरणात असे दाखवून देण्यात आले होते की जरी कलम २ (जे) मध्ये अतिशय व्यापक अर्थसूचक शब्द वापरले गेले असले, तरी काही आजीविका, सेवा किंवा उपक्रम वगळण्यासाठी उचित आणि न्याय्य पद्धतीने एक रेष ओढावी लागेल. त्यात वापरलेल्या सर्व शब्दांना जर त्यांचा व्यापक अर्थ दिला गेला, तर सर्व सेवा आणि सर्व आजीविका या व्याख्येच्या कक्षेत येतील, ज्यात नोकराने केवळ वैयक्तिक किंवा घरगुती बाबींमध्ये आणि अगदी अनौपचारिक पद्धतीने दिलेल्या सेवांचा समावेश असेल. त्यामुळे कलम २ (जे) मध्ये वापरलेल्या विस्तृत शब्दांचा अर्थ लावताना रेष कुठे ओढायची आणि कोणत्या मर्यादा वाजवीपणे अंतर्भूत कराव्यात याचा विचार करावा लागेल. पुढे, कलम २ (जे) मध्ये वापरलेला 'उपक्रम' हा शब्द व्यापार किंवा धंद्यशी सदृश्य असल्याचे समजावे आणि त्यामुळे प्रश्नास्पद असलेले उपक्रम मध्ये आर्थिक कार्य समाविष्ट असणे आवश्यक आहे ज्यामध्ये भांडवल गुंतवले जाते आणि जे नफ्यासाठी किंवा कामगारांच्या रोजगाराद्वारे वस्तूंचे उत्पादन किंवा विक्रीसाठी केले जाते, असे म्हणणे पूर्णपणे स्वीकारले गेले नाही आणि असे दाखवून देण्यात आले की एखादे कार्य चालू ठेवण्यामध्ये नफा हा हेतू जरी अविद्यमान असला तरी त्यास उद्योग म्हणून मानले जाऊ शकते आणि मानलेच पाहिजे. पुढे असा निर्णय देण्यात आला कि, कोणत्याही भांडवल गुंतवणुकीच्या अनुपस्थितीचा अर्थ असा नाही की एखादे उपक्रम हे कलम २ (जे) मध्ये समाविष्ट केलेला नाही.

त्यानंतर त्या प्रकरणामध्ये कलम २(जे) च्या उद्दिष्टांसाठी कोणत्या प्रकारच्या कार्यांना 'उपक्रम' च्या अर्थातून वगळले जाऊ शकते यावर विचार करण्यात आला. असे दाखवून देण्यात आले की सार्वभौम कार्य म्हणून योग्यरित्या वर्णन केले जाऊ शकणारे सरकारी कार्य कलम २ (जे) च्या व्याप्तीच्या बाहेर होते, कारण ती अशी कार्ये होती जी सनदशीर सरकार शासनासाठी हाती घेऊ शकते आणि घेतलीच पाहिजे व जी

1 [१९६०] २ एस. सी. आर. ८६६

कोणत्याही खाजगी नागरिकाला हाती घेता येत नव्हती. लॉर्ड वॉटसनच्या शब्दात या सार्वभौम कार्यांची व्याख्या 'सनदशीर सरकारची प्राथमिक आणि अविभाज्य कार्ये' अशी केली गेली होती, परंतु त्यात सरकारने आपल्या कल्याण धोरणांचा पाठपुरावा करण्यासाठी हाती घेतलेल्या उपक्रमांचा समावेश असणे आवश्यक नाही. हे देखील दाखवून देण्यात आले की जरी नफा हेतुच्या अनुपस्थितीत एखाद्या कार्यास एखादे उपक्रम मानले जाऊ शकते, तरी असा हेतू असणे हे कलम २ (जे) च्या अर्थानुसार उपक्रम हा उद्योग आहे की नाही याचा विचार करण्यासाठी एक महत्वाची परिस्थिती असेल.

त्यानंतर या खटल्यात अशा गुणविशेषांचा विचार केला गेला कि ज्याच्या उपस्थितीमुळे एखाद्या कार्याला, त्याचे व्यापार व धंद्याशी साम्य आहे या आधारावर, कलम २(जे) खाली एखादा उपक्रम मानता येईल. हि गुणविशेष निश्चितपणे किंवा परिपूर्ण रीतीने नमूद करणे कठिण होते असे दाखविण्यात आले मात्र एक कार्यकारी तत्त्व म्हणून असे म्हटले गेले होते की मालाचे उत्पादन किंवा वितरण करण्यासाठी किंवा मोठ्या प्रमाणात समूहाला किंवा अशा समूहाच्या एखाद्या भागाला कर्मचाऱ्यांच्या मदतीने महत्वाच्या सेवा प्रदान करण्यासाठी पद्धतशीरपणे किंवा सराईतपणे हाती घेतलेले कार्य हे अधिनियमातील अर्थानुसार उपक्रम असेल, जर ते व्यापार किंवा धंद्या सारखे संघटित पद्धतीने चालविण्यात येत असेल. अशा प्रकारे, ज्या पद्धतीने पश्नास्पद कार्य संघटित केले गेले किंवा त्याची व्यवस्था केली गेली ती पद्धतीला, तिचे कार्य यशस्वी होण्याकरिता आवश्यक असलेला नियोक्ता व कर्मचारी यांच्यातील सहकार्याच्या स्थितीला आणि तिचे समूहाला महत्वाच्या सेवा देण्याच्या उद्दिष्टाला विभिन्न कार्य होईल अशा वैशिष्ट्यांपैकी काही वैशिष्ट्य मानले जाऊ शकते, ज्यांस अधिनियमाचे कलम २(जे) लागू होऊ शकते. म्हणून आपल्याला हे पाहावे लागेल की अपीलकर्त्याचे कार्य या प्रकरणात निर्धारित केलेल्या कसोट्यांचे समाधान करते की नाही आणि जर तसे झाले तर ते कलम २ (जे) च्या अर्थानुसार एक उपक्रम असेल.

या प्रयोजनासाठी अपीलकर्ता-संघ याची स्थापना कोणत्या उद्दिष्टाने करण्यात आली होती आणि ती कोणते कार्य करत आहे याची परीक्षण करणे आवश्यक असेल. विद्वान महान्यायवादी यांचे मुख्य म्हणणे असे आहे की अपीलकर्ता-संघ हे शैक्षणिक

कार्याच्या स्वरूपात असलेले संशोधन केंद्र आहे आणि म्हणून त्याचे व्यापाराच्या किंवा धंद्याच्या स्वरूपातील कार्यांशी साम्य नाही. ते, या संबंधात द फेडरेटेड स्टेट स्कूल टीचर्स असोसिएशन - विरुद्ध - द स्टेट ऑफ व्हिक्टोरिया [1] या मध्ये ऑस्ट्रेलियन उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर अवलंबून आहेत, ज्यामध्ये असा निर्णय देण्यात आला आहे कि, शिक्षणाशी संबंधित समुचित संविदेनुसार आणि सांविधिक विनियमांनुसार चालविले जाणारे राज्याचे शैक्षणिक कार्य, कॉमनवेल्थ कन्सिलीअशन व आर्बिट्रेशन ॲक्ट च्या कलम ४ मधील अर्थांतर्गत उद्योग होत नाही.

अपीलकर्ता-संघ १९४७ साली स्थापन झाली आणि संस्थापकांचे उद्दिष्ट वस्त्रिर्माण व्यापार किंवा उद्योग आणि त्यासह संलग्न असलेले किंवा त्याच्याशी आवश्यक असलेले इतर व्यापार व उद्योगांच्या संबंधी संशोधन आणि इतर वैज्ञानिक कार्य करण्याच्या प्रयोजनासाठी वस्त्रनिर्माण संशोधन संस्था स्थापन करणे होता. वस्त्रनिर्माण उद्योगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सामग्रीच्या उत्पादनामध्ये व सुधारणांमध्ये बारीक तपास करणे, उद्योगाने उत्पादित केलेल्या वस्तूंचे उपयोजन करणे, उद्योगात वापरत असलेल्या यंत्रांमध्ये व उपयंत्रांमध्ये सुधार करणे, जास्त कार्यक्षमता, पुनः संघटन व खर्चामध्ये घट प्राप्त करण्याच्या हेतूने वस्तू - निर्माणच्या विविध प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे, कामाची स्थिती, वेळ व गतीचा अभ्यास , थकवा आणि विश्रांती करीता विराम, कामाच्या पद्धतीचे मानकीकरण, कारखान्याची परिस्थिती तसेच आणि वस्त्र गिरणीतील नोकरीतून उध्दभवणारे रोग व अपघात विषयी संशोधन करणे या प्रयोजनासाठी होते. हि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, अपीलकर्ता संघाला प्रयोगशाळा, कर्मशाळा किंवा कारखाने स्थापन करावयाचे होते, त्यांना सुसज्ज करावयाचे होते आणि त्यांना सुस्थितीत ठेवायचे होते आणि प्रयोग करायचे होते व चालवायचे होते, पुस्तके, संशोधन निबंध, नियतकालीक, इत्यादी तयार करावयाचे होते, त्यांचे संकलन करावयाचे होते, ते छापायचे होते, प्रकाशित करावयाचे होते, निर्गमित करावयाचे होते, त्याचे संपादन करावयाचे होते आणि ते प्रसृत करावयाचे होते; तसेच त्यांना संग्रहालये, वाचनालये स्थापित करावयाची व तयार करावयाची होती व उद्योगाशी संबंधित वाङ्मय, आकडेवारी, वैज्ञानिक आधारसामग्री आणि इतर माहिती संग्रहित करून सुस्थितीत

---

1 (१९२९) ४१ सी. एल. आर. ५६९.

ठेवायची होती; संशोधन निबंधांचे वाचन करणे, व्याख्यान देणे, सल्ला देणे आणि सल्लागार अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे याच्या द्वारे त्याचा प्रसार करावयाचा होता; इष्ट वाटेल असे शुल्क किंवा पारिश्रमिक देऊन संघाच्या उद्दिष्टांच्या संबंधी कुशल, व्यावसायिक किंवा तांत्रिक सल्लागार अथवा कामगार यांची नियुक्ती करावयाची होती किंवा त्यांना टिकवून ठेव्हायचे होते; वस्त्रनिर्माण संशोधनासाठी शाळा व महाविद्यालये स्थापन करावयाची होती, त्यांस सहाय्य द्यावयाचे होते किंवा ती चालवायची होती तसेच संशोधन कार्यात गुंतलेल्या विद्यार्थ्यांना आधार देण्यासाठी स्कॉलरशिप व शिष्यवृत्ती प्रदान करावयाची होती आणि उक्त उद्योगाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी संघाच्या सदस्यांना वापर करणे शक्य होईल असा नवशोध, सुधार, प्रक्रिया, साहित्य व संकल्पचित् यांच्या आणि त्यांच्या स्वरूपाची व गुणावगुणांची माहिती करून द्यावयाची होती. अशा प्रकारे हे दिसून येईल की जरी या संघाचे उद्दिष्ट संशोधन असले तरी, जास्त कार्यक्षमता, पुनःसंघटन आणि खर्चामध्ये घट प्राप्त करण्यासाठी सदस्य गिरण्यांना उत्पादन पद्धती सुधारण्यास मदत करण्याच्या कल्पनेसह ते संशोधन निर्देशित केले गेले होते. त्यामुळे अपीलकर्त्याने केलेल्या संशोधनाचा आधार वस्त्रनिर्माण उद्योगाला आणि विशेषतः सदस्य गिरण्यांना मोठ्या प्रमाणात नफा कमावण्यास मदत करणे हा होता आणि हे प्रामुख्याने परिश्रमिका देऊन तांत्रिक कर्मचारीवर्गाच्या रोजगाराद्वारे केले जाणार होते. या संबंधात अपीलकर्ता संघाच्या नियम आणि विनियमांचे नियम १३ चा संदर्भ घेतला जाऊ शकतो, ज्यामध्ये असे नमूद केले आहे की संघाचा कोणताही सदस्य ज्याला असे वाटते की संघाने हाती घेतलेल्या कोणत्याही प्रस्तावित संशोधनामुळे त्याचे हितसंबंध पूर्वग्रहदूषितपणे प्रभावित झाले आहेत, तो प्रस्तावित संशोधनाच्या उपक्रमाच्या विरोधात सरकारकडे हरकत घेऊ शकतो. नियम १३ सह नियम ४५ सुद्धा असे उपबंधित करते कि, जर असा आक्षेप घेतला गेला तर सरकारने हा आक्षेप निर्णीत करेपर्यंत प्रस्तावित संशोधन सुरू ठेवले जाणार नाही, यद्यपि असे उपबंधित केले आहे की आक्षेप सरकारच्या विचाराधीन असताना सरकार संशोधन सुरू ठेवण्याचे निर्देश देऊ शकते. अपीलकर्ता-संघाचे प्रशासन एका परिषदेमध्ये निहित आहे ज्यामध्ये बहुसंख्यांमध्ये वस्त्रनिर्माण उद्योगाचे प्रतिनिधी असतात. संशोधन हे, आधी सूचित केल्याप्रमाणे, संशोधन संचालकांच्या देखरेखीखाली, तांत्रिक कर्मचारीवर्ग द्वारे केले

जाते, जे सर्वसाधारणपणे अपीलकर्ता-संघाचे पगारी कर्मचारी असतात; परंतु संघाने नियुक्त केलेल्या अशा सर्व तांत्रिक कर्मचारीवर्गाला हाती घेतलेल्या संपूर्ण संशोधनांच्या संदर्भात काटेकोर गुप्तता पाळण्याचे हमी द्यावि लागते. त्यांनी अशा प्रकारे प्राप्त केलेल्या विशेष ज्ञानाच्या त्यांच्या खाजगी क्षमतेत वापर किंवा गैरफायदा न घेण्याचे किंवा त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे ज्ञान प्राप्त केले असेल असा कोणताही नवशोध किंवा प्रक्रिया कार्यान्वित न करण्याची हमी देखील दिले पाहिजे. असे देखील उपबंधित करण्यात आले आहे कि, कोणताही नवशोध किंवा प्रक्रिया, परिषदेने तयार केलेल्या नियमांनुसार व विनियमांनुसार, काटेकोरपणे संघाच्या सर्व सदस्यांप्रमाणे, ज्या मर्यादेपर्यंत आणि जेव्हा केव्हा तसे करण्याची परवानगी दिली जाऊ शकते, त्या प्रमाणे कार्यान्वित केले जाऊ शकते. नियम आणि विनियमांच्या नियम ४२ मधील या तरतुदीचा परिणाम असा आहे की संशोधनाची निष्पती हा संशोधन करणाऱ्या व्यक्तीचा नव्हे तर संघाची मालमत्ता आहे, ज्याचा वापर त्याच्या सदस्यांनी परिषदेने बनवलेल्या नियमांनुसार व विनियमांनुसार केला पाहिजे. मग नियम ४४ असे उपबंधित करते की संशोधनात गुंतलेल्या संघाच्या प्रत्येक कर्मचाऱ्याने लेखी करार करावा की तो त्याच्या रोजगाराच्या मोबदल्यात, अशा संशोधनावर अशा रोजगाराच्या दरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही शोध, नवशोध, संकल्पचित्र किंवा इतर निष्पतीमधील सर्व अधिकार आणि मालकी संघाच्या खर्चावर केवळ संघाच्या फायद्यासाठी आणि संघाला अभिहस्तांकित करण्यासाठी धारण करेल. या तरतुदींवरून हे स्पष्ट होते की जरी अपीलकर्ता संघाची स्थापना संशोधनाच्या हेतूने करण्यात आली असली तरी संशोधनाचा मुख्य उद्दिष्ट संघाच्या सदस्यांचा फायदा होणे हा आहे. संघ चालविण्याचा खर्च अंशतः सदस्यांद्वारा आणि अंशतः सरकार व इतर स्त्रोतांकडुन मिळणाऱ्या अनुदानाने भागविला जातो. अशा प्रकारे हे स्पष्ट होईल की वस्तुतः या संघाची स्थापना त्याच्या सदस्यांच्या फायद्यासाठी संयुक्तपणे वस्त्रनिर्माणाशी संबंधित संशोधन करण्यासाठी करण्यात आली आहे; परंतु यासाठी प्रत्येक सदस्य गिरणीला स्वतःचा संशोधन विभाग स्थापन करावा लागला असता, जो त्यांच्या कार्याचा एक भाग असेल. या परिस्थितीत असे म्हटले जाऊ शकते का की हे एक असे उपक्रम आहे जे पूर्णपणे शैक्षणिक स्वरूपाचे आहे आणि म्हणूनच हे उपक्रम वर नमूद केलेल्या ऑस्ट्रेलियन प्रकरणात समाविष्ट आहे का? अपीलकर्ता-

संघाच्या उद्दिष्टांचा आणि नियम व विनियमांचा विचार करता, आमचे असे मत आहे की ते हॉस्टिपल प्रकरण [1] मध्ये नमूद केलेल्या कसोट्यांना उत्तर देते आणि कलम २ (जे) च्या अर्थानुसार ते एक उपक्रम म्हणून मानले गेले पाहिजे. हे एक पद्धतशीरपणे हाती घेतलेले कार्य आहे; तिचे उद्दिष्ट समूहाच्या एका भागास, (म्हणजेच, सदस्य-गिरण्यांना) - महत्त्वपूर्ण सेवा देणे होते; महत्त्वपूर्ण सेवा हि वस्तुनिर्माण प्रक्रिया, इत्यादी, संबंधी शोध असल्याने जास्त कार्यक्षमता, पुनःसंघटन व सदस्य-गिरण्यांच्या खर्चामध्ये घट प्राप्त करण्याच्या हेतुने, संघाचे कार्य कर्मचाऱ्यांच्या मदतीने (म्हणजेच, तांत्रिक कर्मचारीवर्ग) करण्यात येत होते, ज्यांचा संघाचे कर्मचारी म्हणून त्यांनी केलेल्या संशोधनाच्या निष्पत्तीमध्ये कोणताही हक्क नव्हता; सर्वसाधारण्पणे एखादा व्यापार किंवा धंदा ज्या रीतीने संघटित करण्यात येतो त्या रीतीने तो संघटित करण्यात येत होता किंवा त्याची व्यवस्था करण्यात येत होती; ते यशस्वी होण्याकरिता आवश्यक असलेले नियोक्ता (म्हणजेच, संघ) व कर्मचारी (म्हणजेच, तांत्रिक कर्मचारीवर्ग आणि इतर) यांच्यामधील सहकार्य आधारतत्व असल्याचे मांडते, कारण नियोक्ता संघाचे कार्य चालू ठेवण्यासाठी पैसे पुरवितात आणि त्याचे उद्दिष्ट स्पष्टपणे समूहाच्या एका भागास वस्तुनिर्माण प्रक्रिया, इत्यादी, संबंधी शोध द्वारे महत्त्वपूर्ण सेवा देणे होते जेणेकरून जास्त कार्यक्षमता, पुनःसंघटन व सदस्य-गिरण्यांच्या खर्चामध्ये घट प्राप्त करता येईल. त्यामुळे आमच्या मते या संघाच्या कार्यांचा, ज्याला निव्वळ शैक्षणिक संस्था म्हटले जाऊ शकते, अशा कार्यांशी फारसा संबंध नाही. ज्या कर्मचाऱ्यांनी सध्याचा औद्योगिक विवाद दाखल केला आहे, ते प्रत्यक्षात अपीलकर्ता-संघाच्या अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या संशोधनात योगदान देत नाहीत हे खरे आहे; परंतु ज्या पद्धतीने संघ संघटित केले गेले आणि संशोधन करणारे तांत्रिक कर्मचारीवर्ग देखील कर्मचारी आहेत ज्यांना त्यांच्या संशोधनाच्या निष्पतीवर कोणताही हक्क नाही, हे स्पष्टपणे दर्शविते की संपूर्ण उपक्रम हा धंदा आणि व्यपाराच्या स्वरूपाचा आहे ज्याद्वारे सदस्य-गिरण्या त्यांच्या उद्योगांच्या संदर्भात अधिक नफा मिळवू शकतील अशा मार्गांचा आणि साधनांचा शोध घेण्याच्या उद्दिष्टाने संघटित केला जातो. या परिस्थितीत आम्हाला या निष्कर्षावर येण्यास अजिबात संकोच वाटत नाही की अपीलकर्ता-संघ असे कार्ये करीत आहे कि जी कलम २ (जे)

1 [१९६०] २ एस. सी. आर. ८६६

मधील "उद्योग" या शब्दाच्या व्याख्ये अंतर्गत स्पष्टपणे येते आणि ते एखाद्या निव्वळ शैक्षणिक संस्थेशी एकरूप केले जाऊ शकत नाही. या प्रकरणाच्या दृष्टीने, जेव्हा अपीलकर्ता आणि त्याच्या काही कर्मचाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला, तेव्हा तो एक औद्योगिक विवाद होता आणि अधिनियमाखाली अभिनिर्णयाकरिता न्यायालयाकडे रीतसर सोपवला जाऊ शकतो.

अपील निष्फळ ठरते आणि याद्वारे ठराविक वादखर्चा सह खारीज केली जाते.

अपील खारीज करण्यात आली.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."